SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

DECEMBER 2022 E-MAGAZINE ISSUE 7

# SATURDAY CLUB BUSINESS MAGAZINE

## भ्रमंती विशेषांक



एकमेकां साह्य करु। अवघे होऊ श्रीमंत।।




# HELPING PASSIONATE ENTREPRENEURS BUILD ORGANIZATIONS WITH GLOBAL MINDSET AND EXTRAORDINARY CAPABILITIES

TransGanization helps entrepreneurs build sustainable and scalable organizations by providing holistic companionship programs.

TransGanization is an intense school of thought that provides timeless wisdom to you and your organization to solve modern business challenges in an inclusive and conscious way. We do this by providing high quality education and companionship programs. Our team lives by the 'LOVE, SERVE, and GIVE' philosophy and is passionate about creating sustainable businesses that are focused towards making the world a better place.

**Climb the ladder of Scalability and Sustainability with TransGanization.**

If you are an entrepreneur creating value for the market, for more than 5 years and have crossed 5 crores in revenue, you deserve to see a different horizon. Connect with us to leap into the next orbit while building a sustainable and scalable organization.

**TransGanization helps Entrepreneurs to build:**

- Technology
- HR
- Marketing
- Sales
- Complete process framework
- Branding
- Corporate Governance and Compliance

TRANSGANIZATION
Enlightened Business Practices

**CONNECT WITH US TO BUILD A SUSTAINABLE & SCALABLE BUSINESS**

W: www.transganization.com
T: +91 76667 40123
E: info@transganization.com
success@transganization.com

WINNER OF




Scan QR code below to become a part of entrepreneurs learning community

Office No. 226, 2nd Floor, NBC Complex, Plot No. 43, Sector 11 CBD Belapur, Navi Mumbai - 400614.

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| Respected Trustees | 1 |
| Board of Directors | 2 |
| लिडरशिप २०२२ - २०२४ | 3 |
| सॅटर्डे क्लबची माहिती | 4 |
| संपादकाच्या लेखणीतून पर्यटनामध्ये बदलत चाललेला कल | 5 |
| टूरिझम इंडस्ट्रीने घेतला मोकळा श्वास | 7 |
| पितांबरी एग्रोटुरीझम एक अविस्मरणीय अनुभव | 9 |
| Adventure अनुभवा Adventure Holidays बरोबर | 12 |
| किमया वास्तुशास्त्राची... समृध्दी व्यापाराची!!! | 15 |
| Unleash your Potential Dashboard your Organization | 17 |
| विशेष लेख लेह-लडाखवर बाईक स्वारी | 22 |
| पर्वतीची पर्वणी | 26 |
| कोल्हापूर रिजन अंतर्गत 'उद्योगिनी' एक उपक्रम | 30 |
| संस्थेच्या शिष्टमंडळाची केंद्रीय मंत्री श्री. नारायण राणेसाहेबांबरोबर भेट | 33 |
| Meeting Schedule | 36 |
| सॅटर्डे क्लब मधील चॅप्टर्सची माहिती | 38 |
| सॅटर्डे क्लब मधील विविध सेल | 43 |


/SaturdayClubGlobalTrust

/SaturdayClubGlobalTrust


ई मॅगेझीन अंक ७ DECEMBER 2022

# SATURDAY CLUB BUSINESS MAGAZINE

# भ्रमंती विशेषांक

संचालक : सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

संस्थापक : कै. माधवराव भिडे

संपादक : उपेंद्र साळवी

संपादकीय मंडळ : रश्मी गोखले, दिनेश थोरात, राजेश चौधरी, विद्या गोगटे, अनिल जोशी

कार्यकारी मंडळ : माधवी हातवळणे, केतकी बंकापुरे, जमीर तांबोळी, कौस्तुभ भंडारी, शिवकला मुदलियार, चंदन नाईक, शुभम कुंभार, भावना अत्रे, प्रमोद कोनकर



सॅटर्डे क्लबच्या अंकामध्ये प्रसिध्द झालेला मजकूर आणि फोटो यांचे कोणत्याही स्वरुपात पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.

**- संपादक**



प्रकाशक : सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट


**महत्त्वाची आणि विशेष सूचना**

हि सूचना हा विशेषांक वाचणाऱ्या प्रत्येक वाचकाला लागू होईल. खालील सुचनेत उल्लेखित केलेली संस्था म्हणजे ''सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट'' आहे.

सदर विशेषांकात येणारे लेख, जाहिराती आणि त्यामध्ये प्रकाशित केलेला मजकूर हा त्या व्यावसायिकाशी किंवा त्याच्या उद्योगाशी निगडित आहे. त्यावर येणारा आक्षेप किंवा विरोध ह्यासाठी संस्था जबाबदार राहणार नाही. त्याचबरोबर लेखामध्ये मांडलेले मत हे लेख लिहिणाऱ्या व्यक्तीचे वैयक्तिक असू शकते तसेच लिहिणाऱ्याने पुरविलेली माहिती हि सुध्दा संबंधित व्यक्तीचीच असेल त्यामुळे कुठल्याही प्रकारे संस्था जबाबदार राहणार नाही. जर काही आक्षेप असेल तर तो scgttimes@gmail.com ह्या ई-मेल वर नोंदवावा.

धन्यवाद!

संपादक


**या अंकात लेख व जाहिरातींसाठी संपर्क साधा :**

**९६१९००७६०६**

**Email : scgttimes@gmail.com**


**खाजगी वितरणासाठी**

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# RESPECTED TRUSTEES




**Shri. Ashok V. Dugade**
Chairman & Managing Trustee
SCGT



**Shri. Pradeep M. Tamhane**
Managing Director
Wincoat Colours & Coatings Pvt. Ltd.



**Dr. Suresh Kashinath Haware**
Managing Director
Haware Builders & Developers



**Shri. Ravindra Prabhudesai**
Managing Director
Pitambari Products Pvt. Ltd.



**Dr. Ajit Marathe**
Managing Director
Nirman Realtors & Developers



**Shri. Vijay Paranjape**
Ex. Siemens,
Business Consultant

# BOARD OF DIRECTORS

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in



**SHRI NARENDRA BAGADE**
Marketing Consultant
Pitambari Agrotourism



**SHRI ATUL ATRE**
Founder
Laser Telesystems Pvt. Ltd.



**SHRI MILIND PATIL**
Founder
Denfab



**SHRI SANTOSH PATIL**
Director
UKs Resort



**SHRI SHAILENDRA THATTE**
Advocate
Shailendra Thatte & Associates



**SHRI CHHABIRAJ RANE**
Managing Director
Chhabi Electricals



**ER. SANGRAM LIMAYE**
Chairman
Sangramsiddhi Pvt. Ltd.

एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ॥

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# लिडरशिप २०२२ - २०२४



## Vinit Bansode
Secretary General - SCGT
The Graphology Research Institute



## Shrikrishna Patil
Deputy Secretary General - SCGT
Apramshri Automations Pvt Ltd



## Suhas Fadanis
Deputy Secretary General - SCGT
DFR Infra Pvt. Ltd.

# सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

सॅटर्डे क्लबची स्थापना भारतातील सुप्रसिध्द ब्रिज इंजिनिअर स्व. माधवराव भिडे यांची, त्यांनी सॅटर्डे क्लबची चळवळ २००० साली सुरु केली. महाराष्ट्रीयांनी उद्योगव्यवसायातून लक्ष्मीची उपासना करावी, एकमेकांना मदत करुन व्यवसायवृध्दी करावी. श्रीमंती हे उद्योजकाच्या प्रगतीचे प्रतिक आहे, त्यामुळे अधिकाधिक मूल्याधारीत आर्थिक प्रगतीसाठी आपण आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

सॅटर्डे क्लबची संकल्पना **''एकमेकां साह्य करु अवघे होऊ श्रीमंत''** या घोषवाक्यात प्रतित होते.

**सॅटर्डे क्लबच्या उद्दीष्टांबद्दल बोलायचे झाल्यास -**

- **परस्पर सहकार्यावर आधारीत महाराष्ट्रीयन व्यावसायिकांचे अर्थपूर्ण जाळे विणणे.**
- **नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी उत्तेजन देणे.**
- **श्रीमंत व एकसंघ महाराष्ट्रीयन व्यावसायिक समाजाची उभारणी करणे.**
- **महाराष्ट्रीयन समाजाची व्यावसायिकतेबद्दलची मानसिकता बदलणे**
- **सहसदस्यांच्या उत्पादन व सेवांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.**
- **सदस्यांनी एकमेकांना नियमित भेटणे.**
- **व्यावसायिक संधींची देवाणघेवाण करणे.**
- **सदस्यांच्या व्यावसायिक अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करणे.**
- **सदस्यांना परस्पर फायद्याचे व्यावसायिक करार करण्यासाठी उद्युक्त करणे.**

अशी दमदार संकल्पना, संस्थापक स्व. भिडेसाहेबांचे कुशल व प्रभावी नेतृत्व आणि समर्पित कार्यकर्त्यांच्या प्रचंड योगदानातून अल्पावधीतच क्लबच्या सदस्यांमध्ये उत्पादक, व्यावसायिक, तंत्रज्ञ, सल्लागार व विविध सेवा पुरविणारे इ. चा समावेश झाला आहे. क्लबच्या कारभारावर विश्र्वस्त मंडळाची देखरेख असते. विश्वस्त मंडळाचे सभासद आहेत.

**श्री. अशोकजी दुगाडे - विश्र्वस्त आणि कार्यकारी संचालक**
**माजी कार्यकारी संचालक बँक ऑफ महाराष्ट्र आणि इंडियन ओव्हरसीज बँक**
**श्री. प्रदिपजी ताम्हाणे - विश्वस्त आणि व्यवस्थापकीय संचालक विनकोट कलर्स अँड कोटिंग्स प्रा. लि.**
**श्री. रविंद्रजी प्रभुदेसाई - विश्वस्त आणि अध्यक्ष पितांबरी प्रॉडक्ट्स् प्रा. लि.**
**डॉ. अजित मराठेजी - विश्वस्त आणि व्यवस्थापकिय संचालक निर्माण ग्रुप**
**डॉ. सुरेशजी हावरे - विश्वस्त आणि जेष्ठ अणुशास्त्रज्ञ व संचालक, हावरे बिल्डर्स**
**श्री. विजयजी परांजपे - विश्वस्त आणि माजी संचालक, सीमेन्स आणि बिझनेस कन्सलटन्ट**
**सेक्रेटरी जनलर श्री. विनीत बनसोडे - द ग्रॅफोलॉजी रिसर्च इन्स्टिटयूट**

या विश्र्वस्त मंडळाबरोबरच CGB व CGC चे सक्रिय सभासद, अशा स्वरुपात संघटनेची दमदार वाटचाल सुरु आहे. आता वेळ आहे येणाऱ्या संधीचा वेध घेण्याची आणि त्याचा उपयोग करुन आपला उद्योगधंदा वाढविण्याची, आपली कार्यकारीणी सभासदांच्या व्यवसायवृध्दीसाठी सतत प्रयत्नशील आहे. मित्रहो, बरेच काही करावयाचे आहे. आपली कार्यकारीणी या दृष्टीने काम करण्यासाठी कटीबध्द आहे. या उपक्रमात आपल्या सर्वांच्या सक्रिय पाठींब्याची गरज आहे. एकीची वज्रमुठ आपल्या सर्वांच्याच आर्थिक व व्यावसायिक उन्नतीसाठी निश्चितच उपकारक ठरेल.

**चला तर.....उद्योग व्यवसायाच्या वाढीतून धनवृध्दीचा दृढसंकल्प करुन त्यानुसार कामाला लागूया.**



संपादकाच्या लेखणीतून

# पर्यटनामध्ये बदलत चाललेला कल

**– श्री. उपेंद्र साळवी**

''कुठं कुठ जायचं हनिमूनला'' ह्या गाण्यामध्ये जी स्थळे उल्लेखित केली आहेत त्याजागी हल्ली फार क्वचित कोणी हनिमूनला जात असेल. परवाच मी ऐकले कि माझ्या एका मित्राचा भाऊ आणि त्याची बायको रण ऑफ कच्छ ला बाईक ने हनिमूनसाठी गेले, दोघे ही बाईक्स चांगली चालवतात, तर माझ्याच ओळखीतल्या एका गृहस्थांचा मुलगा आणि त्याची बायको ७ दिवसांच्या क्रुझ स्वारीवर हनिमून साठी गेले. दोन वेगवेगळया प्रकारची, वेगवेगळी आवड असलेल्या व्यक्ती आणि त्यांनी निवडलेले प्रवासाचे पर्याय हेच सूचित करत आहेत की पर्यटनाची व्याख्या हळूहळू बदलत चालली आहे. पण मागच्या काही वर्षांत पर्यटन क्षेत्रात कमालीचा बदल घडला आहे. भारतीय पर्यटक फक्त देशभरातच नाही तर जगभर फिरत आहे आणि मुख्य म्हणजे भारतीय पर्यटकांसाठी परदेशात खास हॉटेल सुध्दा तयार केली जात आहेत जिथे भारतीय खाणे मिळू शकेल.

साधारण १५-२० वर्षां अगोदर पर्यंत, वर्षातून केवळ एकदा, एक कुटुंब मोठी ट्रिप करत असत. पण आता दर विकेंडला छोटी छोटी ट्रिप करणारी लोकं आहेत. त्यात विकेंड जोडून सुट्टी आली तर सोन्याहून पिवळे. एकदिवसीय ट्रिप सुद्धा लोकप्रिय ठरतंय. आत तर थ्रिल म्हणून सरळ खांदयाला बॅग लावून अनेक लोक बाहेर पडत आहेत. सायकल वरुन ७०-७५ किलोमीटर्स ची धौडदौड करणारे लोक, लेह-लडाख, स्पिती व्हॅली सारख्या अत्यंत कठिण आणि ऑक्सिजन कमी असलेल्या ठिकाणी बाईक वरुन सफर करत आहेत. महाराष्ट्राला किल्ल्यांची वेगळी ओळख आहे आज अनेक किल्ले पादाक्रांत करणारे शिलेदार आहेत. महत्वाचे म्हणजे जशी तुमची टेस्ट किंवा आवड तसे पर्यटनाचे विविध पर्याय उपलब्ध आहेत.

ज्या लोकांना निसर्गाचा मनसोक्त आनंद घ्यायचा असतो ते निसर्ग सफारी करतात ज्यांना त्यात वन्यजीव पाहायला आवडतात ते जंगल सफारीचा आनंद घेतात. समुद्र किनारे म्हटले तर गोवाच हा पर्याय समोर असायचा अर्थात आज ही गोवा हे लोकप्रिय आहेच पण कोकण, कर्नाटकात सुध्दा आता अनेक पर्यटकांचे पाय वळले आहेत. इथे तुम्हाला समुद्र किनाऱ्यांचा आनंद तर घेता येतोच पण अनेक वॉटर स्पोर्ट्स द्वारे थ्रिल अनुभवता येते. मागच्या काही वर्षांपासून ऍग्रो टुरिझम हा पर्यटनाचा एक नवीन पर्याय लोकप्रिय होत आहे ज्यात तुम्ही निसर्गाच्या जवळ तर जाताच पण मुख्य म्हणजे मातीशी असलेले आपले नाते अजूनच घट्ट होते. आज अनेक थीम पार्क केली जात आहेत जिथे आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते, तिकडेच पारंपारिक खाद्यपदार्थ खाता येतात. जर तुम्हांला राजेशाही पद्धतीने प्रवास करायचा असेल तर क्रुझची सफर आहेच जिथे सागराच्या लाटांवर स्वार होत सर्व सुखसोयींचा उपभोग घेत तुम्ही प्रवासाचा आनंद घेऊ शकता. आपण भारतीय लोक तसे श्रध्दाळू, देवावर विश्वास ठेवणारे म्हणून अनेक धार्मिक स्थळांच्या टूर्स हि लोकप्रिय असतात विशेष म्हणजे आजकाल यामध्ये तरुणतरुणीही सामिल होत आहेत. कोव्हीड काळामध्ये अनेक लोक वर्क फ्रॉम होम करुन कंटाळले त्यासाठी अनेक रिसॉर्ट, तसेच बड्या हॉटेल्सनी ''स्टेकेशन'' हा नवीन पर्याय उपलब्ध केला ज्यात तुम्ही घराच्या बाहेर येऊन व्हेकेशन पण करु शकता आणि ऑफिसचे काम ही करु शकता. व्यावसायिक पर्यटन हे तर अगोदर पासून प्रसिध्द होतेच पण मागील काही वर्षांत वैद्यकिय पर्यटन हे सुध्दा लोकप्रिय झाले आहे. ज्यामध्ये परदेशी लोक भारतामध्ये काही वैद्यकिय सेवा घेण्यासाठी

येतात आणि इकडच्या पर्यटनाचाही अनुभव घेतात.

पर्यटन क्षेत्रातील अश्या अनेक बदलांमुळे ह्या क्षेत्रात अनेक नवनवीन व्यवसायाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जसे प्रवासात उत्तम फोटो काढले जावे ह्यासाठी फोटो गाईड असतात. टूरची इत्यंभूत माहिती देण्यासाठी किंवा अनुभव सांगण्यासाठी ट्रॅव्हल ब्लॉगर, आजकाल तर टूर इव्हेंट प्लॅनर सुद्धा असतात जे अनेक इव्हेंट आणि पर्यटन ह्याचा योग्य मिलाप करुन देतात. डेस्टिनेशन व्हेडिंग हा त्यातलाच एक लोकप्रिय इव्हेंट. त्याचबरोबर दुभाषी लोकांची (ट्रास्न्लेटर) सतत गरज भासत आहे. कारण जगातल्या विविध देशांतून भारतामध्ये पर्यटक येतात. अशाप्रकारे पर्यटन क्षेत्रात जे विविध बदल घडत आहेत आणि लोकांच्या बदलत जाणाऱ्या आवडीनिवडी ह्यामुळे भविष्यात अनेक व्यवसायांच्या नवनवीन संधी तयार होतील.

शेवटी एवढेच बोलेन उद्या असे गाणे तयार झाले कि ''कुठे कुठं जायचं हनिमूनला ? कान्हा कि ताडोबा, लडाखच्या नुब्राला, सिक्कीम, शिमला कि शिलॉंग ला'' तर आश्चर्य वाटून घेऊ नका कारण पर्यटनाचा कल बदलतोय.

❖❖❖





# टूरिझम इंडस्ट्रीने घेतला मोकळा श्वास

**– श्री. अशोकराव दुगाडे**

उद्योजक मित्रहो

कसे आहात सगळे...??तुम्हां सर्वांना इंग्रजी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा..!!

ह्या वेळेसचा अंक एकदम खासच आहे, ''भ्रमंती विशेषांक''.

गेल्या २ वर्षांच्या कोरोनाच्या सावटानंतर टूरिझम इंडस्ट्रीने खऱ्या अर्थाने मोकळा श्वास घेतला आहे. भारताची विविध छटांनी नटलेली संस्कृती परदेशी पर्यटकांसाठी अनेक वर्षांपासून आकर्षणाचा मानबिंदू ठरत आहे. २०२२ च्या पहिल्या सहामाहीत २.७ करोड पेक्ष्या जास्त परदेशी नागरीक भारतात पर्यटनासाठी आले ज्याचे प्रमाण मागील वर्षापेक्षा ४०६ टक्के जास्त आहे. घरात बसून कंटाळलेले लोकही आता बाहेर पडले आहेत. फिरण्यावर, खाण्यापिण्यावर, खरेदीवर खर्च करत आहेत. त्यामुळेच अर्थव्यवस्थेलाही चालना मिळून तेजी दिसत आहे. बाजारपेठांमधील वातावरण सकारात्मक आहे. अमेरिका, ब्रिटन, जपान आणि बरेसचे विकसीनशील तसेच विकसित देशांपेक्षा आपली अर्थव्यवस्था चांगल्या स्थितीत आहे.

मॅन्युफॅक्चरिंग, कन्स्ट्रक्शन यांच्या खालोखाल जर कोणत्या क्षेत्रात रोजगाराच्या मोठया प्रमाणावर संधी उपलब्ध होत असतील तर ते म्हणजे पर्यटन क्षेत्र. राज्य आणि केंद्र सरकारही पायाभूत सुविधांवर मोठया प्रमाणात खर्च करतेय. देवस्थाने, अपरिचित किंवा दुर्लक्षित ऐतिहासिक स्थळे यांच्या विकासावर भर दिला जातोय. म्हणूनच हया क्षेत्रातील उद्योजकांना आता नाविन्यपूर्ण कल्पना लढवून आपला व्यवसाय पक्का करायच्या मोठया संधी साधता येण्याची तयारी करावी लागेल. सोबतच आपली कॉस्टिंग आणि त्यावर परिणाम करु शकणाऱ्या लहानसहान गोष्टींवरही लक्ष ठेवावे लागेल. उदाहरण दयायचे झाले तर टॉफी, चॉकलेट इंडस्ट्रीची डबल डिजिट वाढ होत होती. पण UPI, GPay ऑनलाईन अशांमुळे थेट पेमेंट व्हायला लागले, सुट्या पैशांचा प्रॉब्लेम निकालात निघाला आणि सुट्या पैशांऐवजी चलन म्हणून वापरल्या जाणाऱ्या टॉफी व्यवसायाचं गणितच बिघडून गेलं. म्हणूनच आपल्या क्षेत्राशी संबंधित वाटत नसल्या तरीही छोट्या वाटणाऱ्या गोष्टींबद्दल सजग राहा.

कोरोनाचे कितीही हाकारे पिटले जात असले तरी भारतीय अर्थव्यवस्था आणि मानसिकता अत्यंत कणखर आहे आणि येत्या वर्षात आपण प्रगतीचेच साक्षीदार राहू अशी सुचिन्हे आहेत.

पुन्हा एकदा तुम्हां सर्वांना इंग्रजी नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!!!

**श्री. अशोकराव दुगाडे**

मॅनेजिंग ट्रस्टी

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

❖❖❖


UKS RESORT
UK'S
RESORT, KHOPOLI
The Break you deserve
AN IDEAL RESORT NEAR MUMBAI-PUNE
FOR ONE DAY PICNIC, OVERNIGHT PICNIC
AND CONFERENCES.
98220 12343
87798 14559
info@uksresort.com
www.uksresort.com
Ideal Resort for chapter socials

# पितांबरी एग्रोटुरीझम एक अविस्मरणीय अनुभव

दापोली येथे पितांबरीच्या एग्रोटुरीझम रिसॉर्टला जाण्याचा योग नुकताच जुळून आला. हे रिसॉर्ट अगदी निसर्गरम्य म्हणजेच निसर्गाच्या कुशीत आहे. एकंदरीत ६२ एकर एव्हढा विस्तीर्ण निसर्गाने वेढलेला असा परिसर, सर्वत्र हिरवळ, रुचकर असे जेवण आणि इथल्या प्रत्येक व्यक्तीकडून मिळणारे आदरातिथ्य अवर्णनीयच. प्रत्येकाने प्रत्यक्षात अनुभवावे असेच हे रिसॉर्ट.

इथे पोचल्यावर इथले कर्मचारी कोकम सरबत घेऊन स्वागतासाठी तयार होते. आमच्या प्रवासाची आस्थेने विचारपूस केली आणि घराच्यासारखा आपलेपणा जाणवला. रिसॉर्टच्या स्वागतद्वारा जवळ छोटेसे पण टुमदार मंदिर, त्यामधील गणेशाची विलोभनीय मूर्ती जणू गणराया हा अनुभव संस्मरणीय ठरेल असाच आशिर्वाद देत होता.

येथील राहण्याची जागा सुध्दा संपूर्ण परिसराप्रमाणे स्वच्छ, सुंदर आणि नीटनेटके, प्रशस्त वातानुकुलित रुम्स त्यातील अगदी व्यवस्थितपणे मांडणी केलेल्या वस्तू, तसेच फर्निचर, अगदी खिडकीचे पडदे सुध्दा नीटनेटके. एका रुममध्ये ४ माणसं आरामात राहू शकतील एव्हढी ऐसपैस जागा. निसर्गाच्या सानिध्यात असल्याने शुध्द हवा, चाफ्याचा मंद सुगंध...सकाळी व्हरांड्यातून दिसणारा सूर्योदय केवळ अप्रतिम...

जवळच असलेला प्रदुषणमुक्त अगरबत्ती आणि निरांजनाच्या तेलाचा कारखाना, ते दाखवणारा सौजन्यपूर्ण स्टाफ...प्रत्येक शंकेचे निरसन होत गेले. पितांबरीने केलेल्या लागवडीतून, फूलांपासून अर्क काढण्याचं तंत्र अशा विविध गोष्टींची माहिती आम्हांला मिळाली. त्यानंतर विस्तीर्ण आणि स्वच्छ अशा स्विमिंग पूल मध्ये डुंबण्याचा आनंद तर काही औरच..माझी मुलं पूलमधून बाहेर यायलाच तयार नव्हती.

रिसॉर्ट मधले आमचे प्रमुख आकर्षक ठरले ते म्हणजे ५ हजार चौरस फूटांचे भव्य रुचियाना रेस्टॉरंट, तिथल्या चविष्ट पदार्थांची रेलचेल..व्वा अगदी मस्तच..उकडीचे मोदक, पुरणपोळी, घावणं, तंदुरी, पंजाबी, मोगलाई, आणि चायनीज, तुम्ही फक्त नाव घ्या भूक चाळवणारं आणि मन तृप्त करणारे पदार्थ समोर हजर...

माझे मित्र मधुमेहग्रस्त परंतू त्यांच्यासाठी सुध्दा विशेष व्यवस्था..एका संध्याकाळी आम्ही जेवत असतांना समोरच्या टेबलावर एक लहान बाळ रडू लागलं तर तिथे बेबीफूडसुध्दा उपलब्ध असलेले पाहून आम्हां सगळयांनाच सुखद धक्का बसला. थोडक्यात काय तर बाहेर असुनही घरातल्या सारखीच प्रेमाची आणि आस्थेवाईकपणे मिळणारी वागणूक..एक अप्रतिम अनुभव.

मनसोक्त भोजन झाल्यानंतर छानपैकी ताणून दिली. कारण रात्री होणाऱ्या आकाशदर्शन कार्यक्रमासाठी उशीरापर्यंत जागण्याची पूर्वतयारीच जणू...

साधारण ४ वाजता चहापान झाल्यानंतर आयुर्वेद गार्डन बघायला गेलो. ५५० पेक्षा जास्त दुर्मिळ आयुर्वेदिक औषधी वनस्पतींची माहिती दापोली कृषी विदयापिठात शिकलेल्या उच्च विदयाविभूषित कर्मचाऱ्यांकडून माहिती घेता घेता २ तास कसे निघून गेले ते कळलंच नाही.

१२ प्रकारच्या तुळशी, कापराचे झाड, रुद्राक्षाचे झाड, कृष्णकमळ, विविधतेने नटलेल्या वेगवेगळया प्रकारच्या वेली अशा अनेक झाडांचा उपयोग आणि त्यांची सविस्तर माहिती मिळाली. मनात विचार आला, निसर्ग मानवी जीवनाचा किती विचार करतो आणि आपण किती अविचारी ह्या निसर्गाशी वागतो ?

याच आयुर्वेद गार्डनमध्ये दिवसभरात १२ वेगवेगळया प्रकारचे पक्षी येतात. पक्षीनिरीक्षक आणि नेचर फोटोग्राफी करणाऱ्यासाठी ती मोठी पर्वणीच. हे सर्व कमीच होतं असे म्हणावे लागेल जेव्हा आमची स्वारी पितांबरी ने उभारलेल्या नर्सरीत गेली. अबब..नर्सरी किती मोठी असावी? कल्पनेच्या पलीकडे, जवळजवळ २.५ लाख झाडे...चंदन, रक्तचंदन, ३२ प्रकारचे बांबू, ४ फूट उंचीचा नारळ, ६ प्रकारचे कलमी नारळ, फणस, काजू, ४ प्रकारचा चाफा, अनंत, लिली, गावठी गुलाब अशी एक आणि अनेक सुगंधी झाडांची प्रचंड लागवड, निसर्गाचा एवढा मोठा खजिना बघून मन अगदी प्रफुल्लित झाले. त्यात कमी म्हणून की काय, मस्त बैलगाडीची रपेट झाली. ती रपेट करतांना जणू माझ्या गावाची आठवण तरळून गेली.

अंधारु लागले होते. गच्चीवरील अंधारात लगबग दिसू लागली. थोडयाच वेळात एक मोठं धूड आमच्यासमोर गच्चीवर स्थिरावले. आम्हांला तिथं बोलावलं गेलं. ते धूड काय असावं याचा अंदाज बांधत गच्चीवर पोहचलो. तोपर्यंत कवर काढलं होतं. समोर एक भली मोठी दुर्बिण आमच्या पुढयात होती. पायरीवर स्टैंड लावला गेला. पितांबरीचा खगोलतज्ञ आला. त्याने ग्रहतारे बघून दुर्बिण सेट केली मग काय आमचा अवकाश प्रवास सुरु झाला. चंद्राच्या खळया, प्रचंड मोठा गुरु, विलोभनीय शनिची कडा..आयुष्यात प्रथमच सगळं अनुभवत होतो. वातावरण हलकंस थंड असतानाच चहा आला. पितांबरीच्या खगोल तज्ञांशी चहाचा आस्वाद घेत चर्चा केली. तेवढयात आवाज आला ''चला आता कराओके म्युझिक सुरु करायचं आहे'' आणखीन एक सुखद धक्का. आमच्यातले बरेचसे लोक गाणी म्हणायला लागले, काही जणं तर ठेका धरुन नाचू लागले. त्यानंतर काय ते रुचियानाचे स्वादिष्ट जेवण..एवढं सगळं झाल्यावर निद्रादेवीची आराधना. मऊशार गादीवर वातानुकुलीत वातावरणात पाठ टेकताच लगेच कशी झोप लागली तेच कळले नाही.

छान झोपेनंतर सकाळी लवकरच जाग आली ती कोकिळे च्या सुंदर स्वराने आणि अनेक पक्ष्यांच्या किलकिलाटने. फ्रेश झाल्यानंतर माझी पावलं दरवाजाकडे वळली, दार उघडताच समोर तांबड फुटू लागलं होते. सूर्यादयामुळे प्रसन्न वाटू लागले. माझी पावलं काल पाहिलेल्या नर्सरीकडे वळली. नर्सरीत फेरफटका करत असतांना मोराच्या ओरडण्याचा आवाज आला, आवाजाच्या दिशेने पाहिले तर चक्क पिसारा फुलवलेला मोर दिसला..आणखीनच आनंदात भर पडली. तासाभराने परत आलो तर सगळेच जण फ्रेश होवून तयार झाले होते. रेस्टॉरंटमध्ये जाऊन छानंस घावणं आणि खुसखुशीत थालीपीठ भरपेट खाल्ली.

प्रचंड रिचार्ज होऊन प्रसन्न मनाने घरच्या प्रवासाला लागलो. माझी बायको, माझी मुलं प्रचंड खूष झाली होती. त्यांची एक कडक मागणी आली, ''पप्पा आपण दर सहा महिन्यांनी इथेच येऊया'' माझं मन तर बोलत होते सहा काय दर तीन महिन्यांनी इथे येवुया आणि मस्त रिफ्रेश होऊया. मी मनोमनी पितांबरी परिवाराचे आभार मानले आणि परतीच्या प्रवासाला लागलो.

**समीर भोस्तेकर,**
**भांडुप चॅप्टर**

❖❖❖

# EXPLORE JAPAN WITH RAJESH

## TOKYO-KYOTO-NARA OSAKA-ALPINE ROUTE AND HIROSHIMA

HURRY
LIMITED SEATS

2023

GROUP SIZE-15

Visit the hidden treasures of Tokyo and places other companies can't even think about going.

25,000 DISCOUNT

IF BOOKED 90 DAYS IN ADVANCE

325000/- PER PERSON

## IF YOU THINK ADVENTURE IS FUN LETS HAVE SOME!!

**Rajesh is going to be your tour guide. He has lived there for 15 years and knows every corner of TOKYO. You will live in Japan like japanese.**







### 13APRIL - 25 APRIL

### 12 DAYS - 11 NIGHTS

Package Includes

- FLIGHT TICKETS
- STAY FOOD
- VISA
- SIGHTSEEING
- 4 TIMES BULLET TRAIN

www.hikari-partners.com

Call or WhatsApp
+91-99696-82961 / 99204-25661

*Tailor Made Tours Avaliable*

# Adventure अनुभवा
# Adventure Holidays बरोबर

Adventure (साहस) म्हटले कि किती जणांना वाटते नकोरे बाबा, खूप रिस्की आहे.. ??
योग्य तंत्र, सूरक्षेची योग्य काळजी घेणारे आणि अनुभवी पर्यटन तज्ञ असतील, तर सामान्य माणसाला ही Adventure एन्जॉय करता येते. तुमच्या कडून एकच हवं, ते म्हणजे धाडस. Adventure म्हणजे ट्रेकिंग, गिर्यारोहण, रॉक क्लाइंबिंग एवढंच नव्हे तर एखादी नवीन जागा एस्कप्लोर करणे, जंगल सफारीचा रोमांच अनुभवणे आणि किल्ले भटकंती करणे पण असते.
जगात बघण्यासारखी स्थळे खूप आहेत, पण भारतासारखे सौंदर्य दुर्मिळ आहे. भारतात अनेक निसर्गरम्य ठिकाणं आहेत जी तुलनेत कमी पर्यटकांनी पाहिली आहेत. आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालया, त्रिपुरा, स्पीती व्हॅली इथे फिरणे पण Adventure च आहे. डोंगराळ परिसर, अनपेक्षित हवामान हे थोडं आव्हानात्मक ठरु शकते. इकडची संस्कृती अनुभवायची एक निराळी मज्जा आहे. माणसे खूप प्रेमळ आहेत आणि निसर्ग अतिशय मोहक आहे. ह्या स्थळांना वर्षभर जरी जाता येत असलं तरी काही ठराविक हंगामात जास्त सुंदर आणि छान वातावरण अनुभवायला मिळते. ज्यांना निसर्ग आवडतो ते सर्वजण इते येऊन मोहून जातील.
भारतातील जंगल सफारी खूप लोकप्रिय आहेत, मुख्यत्वे वाघासाठी पण या जंगलांमध्ये अनेक जंगली प्राणी, पक्षी, सर्प आहेत. भारतीय जंगलामध्ये सस्तन प्राण्यांच्या ५०० प्रजाती आणि २००० पेक्षा जास्त पक्ष्यांच्या प्रजाती पाहायला मिळतात. जंगल सफारी मध्ये जंगल अनुभवायच असतं आणि त्यात वाघ पाहाणे म्हणजे पर्वणीचं जणू. आपल्याकडे अस्वल, बिबटया, ब्लॅक पँथर, कोल्हा, सांबर असे अनेक जंगली प्राणी खुल्या जीप सफारी मधून स्पॉट करता येतात. जंगल सफारीचा चा उत्तम सीझन ऑक्टोबर ते मे असा असतो.
महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांचा अतिशय अभिमानास्पद इतिहास लाभला आहे. यामध्ये ३५० हून अधिक किल्ले आहेत. ज्यात मराठयांचा इतिहास दडून बसला आहे. हे किल्ले एका जाणकार इतिहास अभ्यासाकाबरोबर बघण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.
Adventure Holidays ने गेली २२ वर्षे, २००० हून अधिक पर्यटकांना भारत भ्रमंती, जंगल सफारी सहल, Adventure आणि महाराजांच्या इतिहासाशी बांधून ठेवलंय. संचालक सौ दिप्ती ठाकूर यांना ३० वर्षे पर्यटन क्षेत्राचा अनुभव आहे. त्या भारतातल्या सर्वात मोठया non IATA Association, ETAA या संस्थेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स पदावर ६ वर्षे कार्यरत आहेत. संचालक श्री चंदन ठाकूर, ३५ वर्षे गिर्यारोहण क्षेत्राशी निगडीत आहेत, Nehru Institute of Mountaineering मधून कोसेर्स केले आहेत, हिमालयात त्यांनी ५ मोहिमा पूर्ण केल्या आहेत आणि २१००० फुटांच्या उंचीपर्यंत ते गेले आहेत.
येत्या उन्हाळी सुट्टी मध्ये आपण आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालया ची तुम्हाला सफर करणार आहोत. स्पीती व्हॅली ही भारतामधील अद्‌भूत जागा आहे. इथे भारतातील आणि जगातील सर्वात जास्त उंचीवरील पोस्ट ऑफिस, तिबेटी मठ आणि चंद्रतालसारखा स्वर्गीय तलाव आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये आपण Winter Spiti फिरणार आहोत आणि ऑगस्ट / सप्टेंबर मध्ये Summer Spiti च्या टुर्स नेत आहोत.
किल्ले भटकंती, इतिहास अभ्यासक, श्री. चंदन ठाकूर यांच्याबरोबर करायची संधी सोडू नका. गेली ३५ वर्षे, २०० हून अधिक किल्ले अनेक वेळा त्यांनी बघितले आहेत, तसेच मराठा इतिहासाचे ते अभ्यासक तर आहोतच आणि तो घरो घरी पोहचावा हा त्यांचा ध्यास आहे. या विषयांवर त्यांची प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन पद्धातीने व्याख्याने होत आहेत. ह्या सगळया ऑफबीट सहली, जंगल सफारी, मुलांसाठीचे कॅंप्स, किल्ल्यांवर प्रत्यक्ष जाऊन इतिहासकथन या सगळयांसाठी नक्की Adventure Holidays शी संपर्क साधा ९१३६१५१३५५ / ९१३६९९२९११

**दीप्ती प्रधान - ठाकूर**
संचालक - Adventure Holidays

❖❖❖


RAJAS TRAVELS
A Complete Travel Solution.
www.rajastravels.com
ALL ABOUT CRUISING!
NCL NORWEGIAN CRUISE LINE
RoyalCaribbean INTERNATIONAL
MSC CRUISES
UNIWORLD BOUTIQUE RIVER CRUISES
CORDELIA
Costa
• HOLIDAY PACKAGE • HOTEL BOOKING • FLIGHT BOOKING AT CHEAP RATE
• VISA • PASSPORT ASSISTANCE • GUIDE • TRAIN / BUS BOOKING
CONTACT+91 9820 123 553




# Borderless Logistics

**Air & Sea freight booking**

**Project cargo handling**

**Door delivery & Ex. works pickups worldwide**

**Warehousing & Distribution**

**ATHENA**
**GLOBAL LOGISTICS**
*Transforming the World of Logistics*

909, The Avenue, International Airport Road, Opp. The Leela, Andheri East, Mumbai - 400059,
Tel. : +91 22 3531 1888 | E: sales@athena-logistics.com | W: www.athena-logistics.com

Ahmedabad | Bengaluru | Chennai | Hyderabad | Ludhiana | Mumbai | Mundra | Nashik | New Delhi | Pune

**Uma Murali**
77380 92034
uma@athena-logistics.com

**Prasad Rawool**
98698 01918
prasad@athena-logistics.com

**Sachin Bhatuse**
98214 00275
sachin@athena-logistics.com

एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ।।

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# किमया वास्तुशास्त्राची... समृध्दी व्यापाराची!!!

- रविंद्र जाधव

नमस्कार, श्रीमंत उद्योजक हो...


**केल्याने देशाटन**


पर्यटन मग ते देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय असेल, सर्वांना त्याची उत्सुकता असते. तशी काहींची स्वप्ने, महत्त्वाकांक्षा सुध्दा असतात. कोणी फिरण्यासाठी, उच्च शिक्षणासाठी, नोकरीसाठी अनेक वेळा प्रवास करतात. परंतु काही जणांना मात्र इच्छा असून ही संधी प्राप्त होत नाही. काहींना व्हिसा मिळत नाहीत.

अशाच ग्राहकांना वास्तुसमृध्दीने त्यांच्या जन्मकुंडलीच्या १२, ९, ८, ४ स्थान तसेच वास्तुतील पूर्व-ईशान्य दिशेस संतुलित करुन उपाय केले, त्यानंतर त्यांचा २ वर्ष रखडलेला व्हिसा अवध्या १ महिन्यात अपेक्षितपणे मिळाला.

त्याचप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतील एक ट्रॅव्हल्स कंपनीचा बंद होणाऱ्या व्यवसायास वास्तूशास्त्र उपायाव्दारे पुन्हा संजीवनी दिली आणि त्यांचे मागील वर्षात उत्पन्न ४० टक्क्यांनी वाढले.

आमचे समृध्द उपाय खालील आकृतीप्रमाणे अचूक मूल्यमापन पध्दतीने अल्पावधीतच फायदा देतात.






हे आमच्या ग्राहकांच्या balance sheets व पासपोर्ट सांगतात. देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय प्रवासाचे किंवा व्यवसायाचे, शिक्षणाचे संबंध सोबतच्या आकृतीनुसार कुंडलीस्थाने, दिशांचा योग्य अभ्यास, त्यांच्या अचूक ठिकाणी (मर्मावर) उपाय केल्यास, तुमच्या स्वप्नातील प्रवास, घरातील आनंदित वातावरण ठेवता येते.

तथास्तु

**<u>वास्तुसमृध्दीची वैशिष्टये</u>**

- २००८ पासून कन्सल्टन्सी व कोर्सेस चा अनुभव
- जागतिक ग्राहक व विद्यार्थी वर्ग
- ७० टक्के ग्राहकांकडून रेफरन्स बिझिनेस
- Accurate & Documented, Astro –Vastu Report
- म्हणून यशाचा विश्वास

होय आपल्या वास्तुतच आपली समृध्दी आहे.

**संपर्क रविंद्र जाधव**
वास्तुसमृध्दी (वाशी चॅप्टर)
९९८७२७०९१९ / ९९६७५३७७१८
www.vastusamruddhi.com

❖❖❖

We provide
# Branding related all services under one roof




## Digital Marketing Package

- 10 Posts Designing
- 3 Platform Handle
  Face Book, Instagram, Linkedin
- Social Media Page creation for
  Face Book, Instagram, Linkedin
- Social Media Calendar,
  Strategy making and posting

**Starting from:₹20,000/-**
(Minimum contract 3 months)

## Branding Package

- Logo Designing
- Visiting Card, Letterhead, Envelop Designing
- 4 pages Company Profile
- Leaflet Designing

**Starting from:₹20,000/-**

## Website Package

- 5 page website design
- Domain and hosting for 1 year
- SSL for 1 year
- WordPress integration
- Page-speed optimization

**Starting from:₹35,000/-**

## SEO Package

- On-page Seo
- Google submission
- Google Business profile creation
- Google Analytics setup
- 10 keywords targetting

**Starting from: ₹ 30,000/-**
(Minimum contract 3 months)

For more details plz call
8652673413

W: www.enhancecreations.in
E: pradnya@enhancecreations.in

ENHANCE® creations
*We enhance your USP*

# Unleash your Potential

## Dashboard your Organization


**TransGanization Creation Pvt. Ltd.**



Imagine you driving your car without Dashboard? Yes, Dashboard won't stop you from driving your car but it will restrict you from understanding the current scenario of your vehicle or your trip. Dashboard helps you judge many parameters directly or indirectly which will eventually help you understand your position in order to reach the destination.

Lets understand with an example: You need to reach a location say “A” which is 600 KMs from your source location within 6 hours. Now when you have this data you will guestimate that you need to drive at speed of 100KM/Hour consistently to reach “A”. Dashboard is the only report which will help you monitor the speed at regular intervals in order to reach the destination within the said time. Now a days; with enhancements there are many additional features added in a Vehicle dashboard like Mileage your Car is giving, Car & Environment Temperature and in some car they also provide information if your Car is being driven in “Eco” mode or not. These piece of information helps us take lot of instantaneous decisions which helps in improving our driving experience or trip goal.

So now that you have a basic understanding of Dashboard lets take you to a different horizon. Let imagine a Passenger Aircraft's Cockpit without their Dashboard? As a pilot do you really want to take 250 passengers on-board and fly them to your favorite destination without Cockpit Dashboard? Would you like to do a Mangalyaan Project (Mars Orbiter Mission) as project leader which is worth close to INR 450 Crore without a monitoring system (Dashboard) and without tracking the activities of space shuttle? I am sure you have understood what I am trying to portray. There is a tremendous risk involved in the activities/tasks mentioned above without the Dashboard or you can say continuous monitoring system.




Unfortunately, the reality in the Indian SME space is dangerous. There are many promoters who are driving the car (Organization) without continuous monitoring system. Cruel reality to it is there are quite a few promoters in India who are actually executing a Mangalyaan project or flying an aircraft without the dashboard which eventually leads an Organization to no direction or feeling of un-accomplishment after running the organization for quite a few years.

So what should Promoters do? Let's split the understanding on Dashboard in four simple sections:

### 1) Understand

Dashboard is a simple reporting methodology of various parameters of your organization which is assumed to be automated and regularly monitored by key stakeholders of the Organization including the promoter/s. Dashboard can be basic reports or visualized reports which will simplify complex data sets to provide stakeholders at a glance, the current business performance awareness.

There are hundreds of moving parts in your business that impact your overall performance. A business dashboard summarizes these events with easy-to-understand, real-time data visuals. It important to understand the Dashboard is the first place where warning or future failure will be detected which could help key stakeholder to resolve the issue as soon as possible. The function of a dashboard is to provide real-time results by aggregating and extracting value from all the data you collect and simplify your data into more manageable chunks of visual reports that allows you to see what you are doing right and where you need to improve. When utilized properly, dashboards can be used to help you make informed decisions that dramatically impact business performance – which in turn effects your financial standing.

Dashboard is built with lowest possible level of data available with the organization. Lowest level data here means operational data. Lets take an example:

Manufacturing – Lowest level of data would be how much “XYZ” was manufactured in a shift? To produce XYZ in a shift, how much raw material and other consumables were consumed in KGs or Units? Regular or Live monitoring of such parameters would help key stakeholders take quick decisions in order to improve the overall numbers which would impact financial performance of Organization too. Also, Comparing the actual production capacity per shift with Capacity production per shift would probably help derive the efficiency percentage of the factory/line/shop floor and accordingly can be monitored regularly.

Service – Lowest level of data would be how much “man hours” were utilized to complete certain task or project in total or No of “Jobs completed” by the resource in a day or week depending on the kind of service organization is providing. Parameters associated can also be monitored for improving the overall efficiency of the Organization.

For any other kind of industries who are not able to relate yet; can imagine the most important parameter/s which they would like to know on daily basis. Probably that parameter is the one which could be the anchor lowest level data which you are searching for and accordingly associated datapoints can be identified one by one.

### 2) Analyze

So now lets deep dive into your Organization. Let's try to find that one parameter which you as key stakeholder would like to know on daily basis. While discussing this with multiple Organization, I have felt that there is always one set of parameter which promoters like to focus the most – Financial parameters like Net Profit, Gross Profit, Margins, Ratio's etc. Financial parameter, I agree is important and should be monitored but it cannot be your anchor data point which will lead you to identify and build other parameters of Dashboard unless you are a BANK or NBFC where your raw material or output is Money!

The best dashboards answer important questions about your Organization. Dashboards are designed for quick analysis and continuous information awareness. Dashboards are typically designed for decision makers and for executives to understand their performance and how they can improve the same. Before building any kind of Dashboard it is important to understand what are those questions of promoters whose answers are required on regular basis.

Once you are ready with set of questions (parameters) which can be used in developing dashboard then note down the source of data from where these parameters can be answered. Sources can be following:

a) System / Operational Software / ERP

b) Hardcopy / Daily Register Note Books / Physical Documents

c) Data is not monitored at all

You should consider yourself in safer zone when all your desired parameters to be monitored fall either in option a or b. There are chances few of your parameters till date are not at all monitored. At such times it is important to first build some data collection source in the Organization for such parameters either by making provision in your System / Operational Software / ERP or initiate maintaining data Physically in hard copy form at least on regular interval. Collection of Data should be first stepping stone towards dashboard building.


Post analyzing the source of data for Dashboard building; the bigger question arises where should we build the Dashboard?

a) Check for Provision of building Visual Reports or Dashboard in your on-going System / ERP / Software?

b) Build an offline Dashboard on MS Office (Preferably Excel) or on any other tool

Most of the modern Systems / ERP / Software's do have multiple provisions to build a Dashboard. Nevertheless, even if it is not possible to build on your current system, you can always start off to understand the effectiveness of Dashboard by building it on MS Excel and maintaining data on it on regular basis.


3) Implement



1) ERP / Software / System: You can always ask your internal IT personnel/Team or IT Vendor to help you build a Visual Data report of the selected parameters on your current system. This will help you monitor things seamlessly and effectively. Reports created are based on Lowest level of data (discussed earlier) which will be displayed in summarized format for a quick read through which can be drilled down further if required for further analysis purpose.

Sample Dashboard - Oracle

Sample Dashboard - SAP



2) Excel based Dashboard: From the system you can regularly download data and accordingly get the relevant data entered in the Excel sheet on which Dashboard can be created. Within Excel there are options to create multiple charts of different kind and types which change as per data updates. Many SME's prefer building Excel based dashboards initially and check its effectiveness in decision making before making an investment in building dashboard in system / ERP.

Sample – Excel Dashboard



4) Enhance

Just like Dashboard monitoring is a regular process; updating and enhancing the same dashboard in terms of Data and Front-End Display (System and Excel) is a continuous process. Once a Dashboard is made there are chances in future you would feel the need to update the Dashboard with related parameters or parameters you have missed initially and feel its important to track the same.

Enhancing a Dashboard and maintaining the same is not only a logic to track and monitor your organization but also an art which will further help you slice and dice the required information and ask right questions to your team with regards any kind of inefficiency in any departments or areas or processes.

Its about time, Indian SME's realize that in order to unleash their potential and have competitive advantage dashboarding their Organization is crucial. This will eventually give promoters complete visibility of business, proactively solve issues & make effective decisions, track growth in numbers, ask relevant questions to team, identifying the problems to its core and finally get to the root cause of any issue by drilling down to the problem center.

❖❖❖

BEST TECHNOLOGY SERVICE PROVIDER IN INDIA








**WE SECURE**
YOU AND YOUR
**SURROUNDINGS**
THE MOST TRUSTED FRIEND FOREVER



**24 X 7 CUSTOMER CARE**
**9822355500**

**ARP IT**
*Solutions*

SALE & SERVICE OF LAPTOPS, DESKTOPS, SERVER STORAGE CCTV
www.arpitsolutions.in | Email: arun@arpitsolutions.com

विशेष लेख

# लेह-लडाखवर बाईक स्वारी

- जयेश गोखले



खारदूंगला समुद्र सपाटी पासून १८३८० फुटांवर तिथे ऑक्सिजन कमी, स्पिती व्हॅलीचा क्लिफ हँगर रोड, समुद्रसपाटीपासून १२५०० फुटांवर, जगातला अत्यंत धोकादायक रस्ता, ह्या दोन्ही ठिकाणी बाईक घेऊन जाण्याची कल्पना तुम्ही करु शकता का? आहेत असे काही लोक ज्यांना बाईकस्वारीची नुसती आवड नसून तर त्यांना ते थ्रिल अनुभवायचे असते. असाच आहे, तुमच्या आमच्या सारखा दिसणारा जयेश गोखले, कॅपजेमिनी मध्ये आयटी क्षेत्रात काम करणारा, लेह-लडाख आणि स्पिती व्हॅलीवर बाईक ने तब्बल ६ वेळा स्वारी करुन आलाय. हिमालयन राईडट्रेलस ह्या ग्रुपच्या माध्यमातुन ज्यांना बाईक ने लेह-लडाख जायचे असेल किंवा नुसते हि जायचे असेल तर तो मार्गदर्शन करतो, टूरचे प्लॅनिंग करुन देतो, कार्यक्रम बनवून देतो. तो रॉयल इंडियन डिवोटी ज्यांच्याकडे रॉयल एन्फिल्ड आहे अश्या ग्रुपचा भाग आहे. या ग्रुपमधून त्याला पायलट रायडर किंवा टुर लीड करण्यासाठी बोलावले जाते. लडाख रिटर्न जिथे लडाख ची टूर कशी करावी ह्यासाठी मार्गदर्शन केले जाते त्याचा २ वर्षे तो मॉडरेटर होता. लेह-लडाख ची ट्रिप बाईक वरुन कशी करता येईल, ह्यावर त्याच्याबरोबर दिलखुलास गप्पा झाल्या त्याचा थोडासा सारांश.

१) ह्या सर्वाची सुरुवात कशी झाली?

२०१३ ला मी रॉयल एन्फिल्ड घेतली आणि मग छोटयामोठया सफरी सुरु झाल्या. २०१६ मध्ये रॉयल इंडियन डिवोटी चा भाग झालो. हा ग्रुप दर महिन्याना २ ट्रिप्स करतो. ह्या ट्रिप्स छोटया डिस्टन्स मग मिडीयम डिस्टन्स आणि मोठया डिस्टन्स स्वरुपाच्या असतात. ह्या प्रत्येक ट्रिपची नीट आखणी केलेली असते. ह्याच ग्रुप मधून माझी ओळख झाली अजून एका ग्रुप बरोबर तो होता हिमालयन राईडट्रेलस. इथूनच मग लेह लडाखला बाईकवरुन जाण्याची सुरुवात झाली आणि मग २०१७ ला मी श्रीगणेशा केला. आणि मग फक्त २०२० सोडून ज्यावेळी करोना होता तो सोडून बाकी दर वर्षी लेह-लडाख किंवा स्पिती व्हॅली केले. ह्यावर्षी २०२२ ला बद्रीनाथ-केदारनाथ आणि माना पास केले त्याच्या हि पुढे संपूर्णपणे लष्कराचा अमंल असतो त्याठिकाणी परवानगी काढून गेलो आणि चक्क लष्कराच्या छावणीत राहिलो.

२. ह्या बाईक टुर्सचे प्लॅनिंग कसे होते?

लेह-लडाखला जाण्याचे प्लॅनिंग जाण्याच्या अगोदर तब्बल ४ महिने सुरु होते. तुम्ही किती लोक जाणार आहात ह्याचा काउंट असणे गरजेचे असते, त्यानुसार बऱ्याच गोष्टी ठरतात. तुमच्याबरोबर एक रायडर हा असा असावा लागतो ज्याला त्या क्षेत्राची पूर्ण माहिती असावी लागते. लेह-लडाखच्या एक लोकल टूर ऑपरेटरशी आपण संपर्क ठेवावा. बऱ्याच ठिकाणी तुम्हाला तिकडच्या रहिवाश्यांच्या घरी रहावे लागते मग अशावेळी हा ऑपरेटर ती व्यवस्था बरोबर करू शकतो. लेह-लडाखचे हवामान लहरी असते जर बिघडले तर तिकडचा ऑपरेटर बरोबर मार्ग काढू शकतो. एकदा रूट आणि बाकी व्यवस्था झाली की असते बाईकच्या ट्रान्सफरचे प्लॅनिंग. बरेच लोक इकडूनच बाईकने जातात पण जाऊन येऊन त्यामध्ये तब्बल ८ दिवस लागतात. त्यापेक्षा सरळ बाइक जम्मुला ट्रेन ने पोचवणे जास्त सोईस्कर पडते. ट्रेनमधून फुल पॅकिंग करून न्हे-आण साधारण नऊ ते दहा हजार रुपयांमध्ये होते. जर तुमच्याबरोबर जास्त लोक असतील तर ४० फिट कंटेनरमधून १६ बाईक्स जाऊ शकतात आणि तुम्हाला लागणाऱ्या एक्सेसरीज सुद्धा त्याबरोबर जाऊ शकतात. कंटेनरसुद्धा जास्त महाग पडत नाही आणि ट्रेनपेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने बाइक पोचवल्या जातात. संपूर्ण ट्रिप ही १५-१६ दिवसांची असते. जी जम्मूपासून सुरू होऊन श्रीनगर, कारगिल, लेह, नुब्रा व्हॅली, पँगॉन्ग लेक, हानले, सोमेरेली लेक मग सरचू नंतर मनाली करत चंदीगढला ट्रिप संपते. खरे तर १४ दिवसच ठेवले असतात पण

एक दिवस हा राखीव तुम्हाला ठेवावा लागतो. कारण हवामान, तिकडची परिस्थिती कधीही बदलू शकते किंवा कोणता अपघात झाला किंवा बाइकमध्ये तांत्रिक बिघाड झाला तर हा दिवस कामी येतो.

३. ह्या टुरमध्ये कशाप्रकारची काळजी घेणे गरजेचे आहे?

